साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. २८ ऑक्टोबर २०२४ * पाने-४ * २/-₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## महाविकास आघाडीच्या वतीने राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर

### परळी विधानसभा मतदार संघात तिरंगी लढत होणार?

परळी वैजनाथ, (बातमीदार):- सर्वांचे लक्ष लागलेल्या बीड जिल्ह्यातील परळी विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीच्या वतीने काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी देण्यात आली आहे. यामुळे आता परळी विधानसभा मतदार संघात पालकमंत्री धनंजय मुंडे व राजेसाहेब देशमुख यांच्यात लढत होणार आहे तर युवक नेते राजेभाऊ फड हेही उमेदवारी दाखल करणार असल्यामुळे परळीत या निवडणुकीत तिरंगी लढत होते की काय असे चित्र निर्माण झाले आहे.

राष्ट्रवादी काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी रविवारी (दि.२७) दुपानंतर उमेदवारीबाबतची घोषणा केली. राजेसाहेब देशमुख यांनी या उमेदवारीपूर्वी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिला व शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. रविवारी त्यांना परळी विधानसभा मतदार संघातून उमेदवारी जाहीर झाली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या यादीत परळीसह माजलगाव मतदार संघातून ज्येष्ठ नेते मोहन जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, परळीत महाविकासकडून उमेदवारी मिळविण्यासाठी डझनावर नेते प्रयत्नशील होते. युवक नेते राजेभाऊ फड, सुनील गुट्टे, सुदामतीताई गुट्टे, फुलचंद कराड, श्री बिडगर आदींची नावे यासाठी चर्चीली जात होती. अखेर राजेसाहेब देशमुख यांनी बाजी मारली व महाविकासकडून परळीची उमेदवारी मिळवली आहे. यामुळे इच्छूक असलेल्या अनेक नेत्यांचा हिरमोड झाला आहे. ही उमेदवारी जाहीर झाल्यानंतर युवक नेते राजेभाऊ फड यांच्या परळी येथील शिवाजी चौक व शहरातील अंबाजोगाई मार्गावरील संपर्क कार्यालयात लावलेले बॅनर संतप्त कार्यकर्त्यांनी फाडले. या घटनेची राजकीय गोटात चर्चा होत आहे. दरम्यान, रात्री उशिरा मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची राजेभाऊ फड यांनी अंतरवाली सराटी येथे जावून भेट घेतली. आपल्याला या निवडणुकीसाठी पाठींबा द्यावा अशी विनंती त्यांनी श्री पाटील यांच्याकडे केल्याची माहिती सुत्रांनी दिली.







महायुतीच्या वतीने परळीच्या निवडणूक रिंगणात असलेले पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात महाविकास आघाडीने काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. श्री मुंडे व श्री देशमुख यांच्यात परळीत या निवडणुकीत लढत होणार आहे. युवक नेते राजेभाऊ फड हेही उमेदवारी दाखल करून निवडणूक लढवण्याच्या भुमिकेवर ठाम असल्याने या निवडणुकीत येथे तिरंगी लढत होते की काय असे चित्र सध्या आहे. ***

## यंदा आठवडाभर दीपावलीची धूम

परळी वैजनाथ, (बातमीदार):- दीपावलीच्या सणात यावर्षी एकादशी-द्वादशी वगळता तिथीक्षय नसल्याने पूर्ण सप्ताहाभर हा उत्सव चालणार आहे. दोन सुट्टया जोडून आल्याने गावी जाणाऱ्यांची सोय झाली आहे. सुमारे दोन दशकांनंतर आलेल्या या पर्वणीमुळे दीपावलीतील प्रत्येक सण धुमधडाक्यात साजरा करण्याची संधी मिळणार आहे.




दीपावलीची सुरवात रमा एकादशीला होते. यावर्षी रमा एकादशी सोमवारी (ता.२८) आहे. याच दिवशी गोवत्स द्वादशी आली असून गोऱ्हा असलेल्या गायीचे पूजन या दिवशी करतात. हे दोन मुहूर्त वगळता दिवाळीतील इतर सर्व सण साजरे करण्यासाठी स्वतंत्र दिवस उपलब्ध झाला आहे. रमा एकादशी व गोवत्स द्वादशी सोमवारी झाल्यानंतर ता. २९ रोजी धनत्रयोदशी आहे. सोने खरेदीसाठीही हा मुहूर्त महत्वाचा असतो. त्याच्या दुसऱ्या दिवशी बुधवारी (ता.३०) रिक्ता तिथी (भाकड दिवस) आहे. म्हणजे या दिवशी दीपावलीतील कोणताही मुहूर्त नाही. गुरुवारी (ता.३१) नकर चतुर्दशी आहे. बहुतांश वेळा नरक चतुर्दशीच्या दिवशीच लक्ष्मीपूजन जोडून येते. परंतु, यावर्षी लक्ष्मीपूजनाचा मुख्य सण नरक चतुर्दशीच्या दुसऱ्या दिवशी स्वतंत्रपणे आला आहे. ता.एक नोव्हेंबरला लक्ष्मीपूजन आहे. हा दीपावलीतील सर्वात मोठा उत्सव असतो. बलिप्रतिपदा म्हणजे दिवाळी पाडवा हा सण शनिवारी (दि.२) असून भाऊबीज रविवारी (ता.३) आहे. अशी आठवडाभर दीपावलीची धूम असून यामुळे सर्वांचा आनंद वाढला आहे. ***

## युवक नेते राजेभाऊ फड यांनी अपक्ष लढावे; कार्यकर्त्यांचा आग्रह

परळी वैजनाथ (बातमीदार):- २३३ परळी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने युवक नेते राजेभाऊ फड यांनी उमेदवारीची मागणी केली होती. मात्र ऐनवेळी पक्षाने वेगळाच उमेदवार दिल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी आणि संताप व्यक्त केला जात असून, लोकभावना आपल्या बाजूने असताना सुद्धा पक्षाने डावलले असल्याने राजेभाऊ फड यांनी स्वतंत्र निवडणूक लढवावी असा आग्रह धरला आहे. ही बाब लक्षात घेता सोमवार, दि.२८ ऑक्टोबर रोजी ते प्रचंड शक्तिप्रदर्शन करून आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे.



महाविकास आघाडीकडून परळी मतदारसंघाच्या उमेदवारीबाबत सस्पेन्स कायम ठेवण्यात आला होता. अखेर रविवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून तिसरी यादी जाहीर करण्यात आली. युवक नेते राजेभाऊ फड यांनी पक्षाकडे उमेदवारी देण्याची मागणी केली होती. मात्र ऐनवेळी उमेदवारी नाकारण्यात आल्याने कार्यकर्त्यांत मोठी नाराजी आणि संताप व्यक्त केला जातोय. विशेष म्हणजे फड यांच्या बाजूने मतदारसंघात अनुकूल असे वातावरण होते. लोकांचा त्यांना सकारात्मक प्रतिसाद असून त्यांनी विधानसभा निवडणूक लढवावी असा आग्रह कार्यकर्त्यांनी धरला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षात बंडखोरी अटळ मानली जात असून, राजेभाऊ फड सोमवारी सकाळी ११ वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

***

## राजेश देशमुख यांनी दिला भाजपच्या सदस्यत्वाचा राजीनामा

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याने आता या पक्षाचा आणि माझा कसलाही संबंध उरलेला नाही. इथल्या नागरिकांच्या आशा आणि अपेक्षा सत्ताधाऱ्यांना पूर्ण करता आल्या नाहीत. त्याचा आम्ही पूर्णतः अभ्यास केल्याने मध्यंतरीच्या काळात शरदचंद्र पवार यांच्याकडे आम्ही उमेदवारी मागण्यांसाठी भेटलो आहोत. इथल्या संपूर्ण परिस्थितीची त्यांना सविस्तर माहिती देण्यासाठी शिष्टमंडळ सोबत घेऊन आम्ही मुंबई येथे त्यांची भेट घेतली. मागील काळात पंकजाताई यांच्यासोबत आम्ही काम करण्याचं ठरवल होत मात्र आता बीड जिल्ह्यात हा पक्ष शिल्लक राहतो की नाही अशी अवस्था आहे. जिथे पंकजाताई मुंडे यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांना त्या पक्षात नजरांदाज केले जाते तर आमच्या भवितव्याचा इथे विचार केला जाणार नाही असे वाटल्याने आता आम्ही ज्या मूळ पुरोगामी विचारांच्या पक्षात काम करत होतो तिथेच परत येऊन काम करण्याचे मी ठरवले असल्याचे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत म्हणाले. **



## २३३ परळी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ परळी येथे मतदान अधिकारी यांचे प्रथम प्रशिक्षण संपन्न

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी विधानसभा मतदारसंघातील ३६३ मतदान केंद्राकरिता नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व ईतर मतदान अधिकारी यांचे विधानसभा मतदान प्रक्रियाबाबतचे प्रशिक्षण मुक्ताई लॉन्स व परळी वै येथे तर ईव्हीएम व व्हीव्हीपॅट हाताळणीबाबत क्लासरूम निहाय प्रशिक्षण विद्यावर्धिनी विद्यालय औष्णिक विद्युत केंद्र परळी वै येथे यशस्वीपणे संपन्न झाले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, व्यंकटेश मुंडे सहा निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार परळी वै, तेजस्विनी जाधव सहायक निवडूक निर्णय अधिकारी,जिंबक कांबळे सहायक निवडणूक अधिकारी ,नायब तहसीलदार बाबुराव रुपनर , अण्णा वंजारे,मिलींद गायकवाड, परविन पठाण, ढगे यांच्यासह सर्व क्षेत्रीय अधिकारी , मास्टर ट्रेनर तसेच मंडळ अधिकारी व महसूल विभागाचे व शिक्षण विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. परळी विधानसभा मतदारसंघ निवडणूक २०२४ च्या पार्श्वभूमीवर रविवार दिनांक २७.१०.२०२४ रोजी सर्व कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण संपन्न झाले.अधिकारी व कर्मचारी यांची संख्या लक्षात घेता कोणत्याही प्रकारचा विस्कळीतपणा न येता सुलभ पद्धतीने प्रशिक्षण संपन्न व्हावे यासाठी प्रशिक्षण सकाळ आणि दुपार अशा दोन सत्रात दोन वेगवेगळया ठिकाणी संपन्न झाले.




(उर्वरित पान ४ वर)

# ना.धनंजय मुंडे यांनी परळी विधानसभेसाठी दाखल केला आपला उमेदवारी अर्ज

परळी वैजनाथ (बातमीदार):- कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या भगिनी तथा विधान परिषद सदस्य आ. पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्यासह परळी मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या सोबतीने आपला उमेदवारी अर्ज आज परळी येथील तहसील कार्यालयात दाखल केला आहे.

धनंजय मुंडे यांनी साध्या पद्धतीने, कोणतेही शक्ती प्रदर्शन न करता दुपारी १ वाजेच्या दरम्यान आपला उमेदवारी अर्ज दाखल केला, यावेळी स्वतः आ.पंकजाताई मुंडे यांनी सुचकाची भूमिका निभावली.

अर्ज दाखल करण्यापूर्वी नाथरा येथील निवासस्थानी धनंजय मुंडे यांचे त्यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई पंडितराव मुंडे यांनी औक्षण करून आशीर्वाद दिले. यावेळी सौ. राजश्रीताई धनंजय मुंडे व धनंजय मुंडे यांच्या ज्येष्ठ भगिनी शकुंतलाताई केंद्रे या उपस्थित होत्या. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी नाथरा येथील ग्रामदैवताचे दर्शन घेऊन गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृतीस्थळी पांगरी येथील गोपीनाथ गडावर जाऊन स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांना




नमन केले.

परळी शहरात आल्यानंतर बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या मंदिरात जाऊन विधिवत पूजन करून धनंजय मुंडे यांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. त्यानंतर पिता स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे यांच्या कनेरवाडी परिसरातील समाधीस्थळी जाऊन अभिवादन करत आशीर्वाद घेतले.

परळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा त्याचबरोबर रेल्वे स्थानक परिसरातील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर धनंजय मुंडे हे आपल्या भगिनी आ.पंकजाताई, डॉ.प्रीतम ताई यांसह सहकाऱ्यांच्या समवेत तहसील कार्यालयात अर्ज सादर करण्यासाठी दाखल झाले.

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना आपण कोणतीही निवडणूक हलक्यात घेत नाही, स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक असो, लोकसभा असो किंवा विधानसभा असो, प्रत्येक निवडणूक आपण पूर्ण ताकतीने लढत असतो; त्यामुळे यशाची हमखास खात्री मिळते. विरोधकांना कोण उमेदवार मिळेल किंवा आपल्या विरोधात कोण उभे असेल याबाबतची काळजी न करता मी आजवर केलेली कामे आणि माझ्या मनात असलेले विकासाचे व्हिजन घेऊन लोकांमध्ये जाणार आहे आणि स्वतःसाठी मतदान रुपी आशीर्वाद मागणार आहे, असे धनंजय मुंडे म्हणाले.

मी आज महायुतीतील घटक पक्षाची नेता म्हणून आणि बहीण म्हणून धनुभाऊंच्या या निवडणुकीत आज सुचकाच्या भूमिकेत आले आहे. ही निवडणूक धनु भाऊ व मी परळीसाठी आजवर जे केले, त्या कामांच्या बळावर धनु भाऊ जिंकतील असा मला विश्वास आहे. संपूर्ण निवडणुकीत मीही आता धनुभाऊंच्या प्रचारासाठी मैदानात उतरणार आहे, असे यावेळी आ.पंकजाताई मुंडे म्हणाल्या.

यावेळी विधानपरिषद सदस्य आ.पंकजाताई मुंडे, माजी खा. डॉ.प्रीतमताई मुंडे, माजी आ.डॉ.मधुसूदन केंद्रे, माजी आ.आर टी देशमुख, रा.कॉ.चे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, अजय मुंडे, वाल्मिक अण्णा कराड, वैद्यनाथ बँकेचे अध्यक्ष विनोद सामत, कल्याणराव आखाडे, गोविंदराव देशमुख, शिवाजी सिरसाट, विजय वाकेकर, वैजनाथराव सोळंके, भाजप तालुका प्रमुख, सतीश मुंडे, बाबुराव मेनकुदळे, बाजीराव धर्माधिकारी, जाबेर खान पठाण, शिवसेना तालुका प्रमुख व्यंकटेश शिंदे, ॲड.गोविंदराव फड, प्रा.विनोद जगतकर, राजाभाऊ औताडे, अभय मुंडे, रामेश्वर मुंडे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सौ.प्रज्ञाताई खोसरे, दीपक देशमुख, सूर्यभान मुंडे, प्रा. मधुकर आघाव, विश्वाम्भर फड, माऊली तात्या गडदे, शिवाजीराव गुट्टे, शरद राडकर, राजा भैय्या पांडे, सत्यजित सिरसाट, श्रीहरी मुंडे, निळकंठ चाटे, पवन मुंडे, वसंत राठोड, वैजनाथ माने यांसह महायुतीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**पंकजाताई व प्रीतमताईंनी केले औक्षण** :- दरम्यान उमेदवारी अर्ज भरायला जाण्याअगोदर आ.पंकजाताई मुंडे, माजी खा.डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी आपल्या यशश्री या निवासस्थानी धनंजय मुंडे यांचे औक्षण करून आगामी निवडणुकीसाठी शुभेच्छा दिल्या. **

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे परळी मतदार संघात अभिजित देशमुख यांना उमेदवारी

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) महाराष्ट्र नवनिर्माण तर्फे परळी वैजनाथ मतदार संघात एन. के. देशमुख यांचे पुतणे उच्चविद्याविभूषित तसेच महत्वाकांक्षी उद्योजक असलेल्या अभिजित दादा देशमुख यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने २३ ऑक्टोबर रोजी जाहीर केलेल्या उमेदवार यादीत मतदारसंघ क्र. २३३ परळी वैजनाथ येथे अभिजित दादांची उमेदवारी जाहीर होताच मनसैनिकांत उत्साह संचारला आहे. याबाबत बोलताना मायबाप जनता आणि राज ठाकरे साहेबांचा विश्वास सार्थ ठरवण्यासाठी मनसैनिकांच्या सहाय्याने प्रयत्नांची पराकाष्ठा करणार असे प्रतिपादन अभिजित दादा देशमुख यांनी केले आहे.

दैदिप्यमान कौटुंबिक वारसा, उत्तम संस्कार, विविध प्रकारच्या व्यवसायांचा अनुभव ते सुद्धा अगदी तरुणाईत असे रसायन असलेल्या अभिजीत दादा देशमुख यांना राज ठाकरेंनी आवर्जून प्राधान्य दिले आहे.

परळी वैजनाथचे यशस्वी नगराध्यक्ष असताना परळी वैजनाथ शहरात राष्ट्रमाता जिजामाता उद्यान, नटराज रंग मंदिर, महात्मा फुले भाजी मंडई, पक्के आणि मजबूत रस्ते, दररोज पाणी पुरवठा



करण्यासाठी पिण्याच्या पाण्याची उत्तम योजना आदी उत्तमोत्तम उपक्रम यशस्वी नगराध्यक्ष म्हणून एन. के. देशमुख यांनी राबविले होते आता त्यांचाच सक्षम वारसा अभिजित दादा देशमुख पुढे नेतील याची खात्री मनसैनिकांना आहे. यासोबतच विविध व्यवसायांची पायाभरणी त्यांनी केली होती. आता त्यांचा सक्षम वारसा अभिजित दादा देशमुख समर्थपणे पुढे नेत आहेत. केरोसीन (रॉकेल) पुरवठा, एच पी पेट्रोल पंप, कायनेटीक व टिव्हीएस गाड्यांची डिलरशिप, सिएट व एम आर एफ टायरची एजन्सी, एक्साईड बॅटरीची एजन्सी, श्री व नाथ चित्र मंदिर (टॉकीज), हॉटेल अजंटा इंटरनॅशनल, हेल्थ क्लब, बांधकाम व्यवसाय, दूध डेयरी, महाराष्ट्र शेतकरी साखर कारखाना आदी व्यवसायांचा त्यांना अनुभव आहे. यातून हजारो जणांना रोजगार मिळालेले आहेत.

उल्लेखनीय बाब म्हणजे ग्रामीण भागातील जनतेच्या समस्या ओळखून जेमतेम तिशीत असताना त्यांनी सायखेडा येथे महाराष्ट्र शेतकरी साखर कारखान्याची पायाभरणी करण्याचे धाडस केले. कारखाना यशस्वीपणे चालवून हजारो शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना दिलासा दिला. दुष्काळी किंवा अन्य कारणांमुळे मराठवाड्यातील अनेक कारखाने अडचणीत आले आणि बंद पडले. पण, अभिजित दादांचा वेगळेपणा इथेच कळतो की त्यांनी स्वतःपेक्षा शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत कारखाना एका अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित केला पण एका अटीवर की शेतकऱ्यांचे हीत लक्षात घेऊन काही झाले तरी कारखाना चालूच राहिला पाहिजे. यातून अभिजित दादांची सामान्य जनांप्रति असलेली तळमळ दिसते. सोबतच अनेक गरजूंना विविध प्रकारे अभिजित दादा कोणताही गाजावाजा न करता मदत करत असतात. करोना काळात सर्व जग बंदिस्त झालेले असताना गरजू लोकांना ग्रामीण भागात जाऊन त्यांनी मदत केली पण कुठेही वाच्यता केली नाही अशा भावना मनसैनिक व्यक्त करत आहेत.

## धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी उभारणार ६०० कोटींचा अतिरिक्त प्रकल्प



परळी वैजनाथ (बातमीदार):- बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीला दिलेल्या विश्वासामुळे कंपनीने त्यांच्या परळी येथील सिमेंट ग्रायंडिंग युनिटच्या उत्पादन क्षमतेमध्ये पाच पटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून याठिकाणी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक कंपनीने दोन टप्प्यात करणार असल्याचे जाहीर केले आहे.

या उद्योगामुळे अल्ट्राटेक या जागतिक दर्जाच्या कंपनीचे अतिरिक्त युनिट परळीत उभा राहणार असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांचे शिष्टमंडळ परळी येथे धनंजय मुंडे यांच्या भेटीला आले होते, यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनीने क्षमता वाढीसाठी दि.२४ रोजी संपन्न झालेली पर्यावरण जनसुनावणी पार पडल्यानंतर परळी येथील युनिट साठी दोन टप्प्यांत अतिरिक्त ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली असल्याचे कंपनीच्या वतीने कळविण्यात आले आहे. या आधी देखील धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैजनाथ शहरालगत इंडिया सिमेंट कंपनीने सदरील युनिट सुरू केले होते. त्याद्वारे देखील मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे.

त्यानंतर आता जागतिक दर्जा प्राप्त असलेली अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या या मोठ्या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात विविध इतर पूरक उद्योगांना चालना मिळणार असून स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार आहे. या गुंतवणुकीसाठी मान्यता दिल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीच्या संचालक मंडळाचे आभार मानले आहेत. ***

(पान १ वरुन).........**प्रथम प्रशिक्षण संपन्न**

सकाळच्या सत्रात व दुपार सत्रात १५४८ कर्मचारी यांना हे प्रशिक्षण स्वतंत्रपणे देण्यात आले. या प्रशिक्षणाची सुरुवात ही राष्ट्रगीताने करण्यात आली. तद्नंतर माननीय जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचा या प्रशिक्षणास उद्बोधन करणारा व मार्गदर्शन करणारा व्हिडिओ संदेश प्रथम दाखवण्यात आला. या प्रसंगी मार्गदर्शन करताना निर्णय अरविंद लाटकर निनिअ यांनी नियुक्त मतदान अधिकारी यांना ईव्हीम व साहित्य व विविध अहवाल याबाबतीत सविस्तर माहिती व मार्गदर्शन करून निवडणूकीचे कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच वाचन व पालन करणे आवश्यक असल्याचे सांगितले.

यावेळी व्यंकटेश मुंडे सनिनिअ तहसिलदार यांनी नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना परळी विधानसभा मतदारसंघात होणारे मतदान साहित्य वितरण केंद्र व स्विकृती केंद्र व त्याचे नियोजन, मतदानाचे आदल्या दिवशी व मतदान दिवशी करावयाची महत्वाची कामे, ईव्हीम मॉक पोल, सिलींग, विविध घोषणापत्र, लिफाफे ईत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष मतदान यंत्र हाताळणीचे प्रात्यक्षिक नायब तहसिलदार मिलींद गायकवाड व बालाजी कचरे अवल कारकुन यांचे नियोजनाखाली सर्व झोनल अधिकारी व मास्टर ट्रेनर यांनी विद्यावर्धिनी विद्यालय येथे खोलीनिहाय करण्यात आले . मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक व खुल्या वातावरणात पार पाडण्यास सहाय करून आपले राष्ट्रीय कर्तव्य व जबाबदारी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावी असे आवाहन केले.

प्रशिक्षण सत्रांमध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान यंत्र, व्हीव्हीपॅट मशीन याचे प्रात्यक्षिक पाहून मतदान यंत्रे स्वतः हाताळनी करून पहिली. या प्रशिक्षणाच्या प्रस्ताविकातून नायब तहसीलदार बाबुराव रुपनर व पुरवठा निरीक्षण अधिकाकी ढगे यांनी सर्व कर्मचारी यांची भोजन व चहापाणी नियोजन पाहीले .सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी श्री आर फी कुमटकर,श्री उडते,गणेश फड, मंगल मुंडे, श्री धनराज भाडेकर ,महसूल सहाय्यक, श्री पंकज दहातोंडे व मुसळे लिपिक नगर परिषद परळी, व ईतर शिक्षक वसीम शेख , श्री अनिल गवळी, श्री दिगंबर शिनगारे महसूल सहाय्यक तसेच सर्व तलाठी, मंडळ अधिकारी, कोतवाल व शिपाई यांनी परिश्रम घेतले. ***

संपादकीय...

# आली दिवाळी...!

**सुविचार :-**
विचार एका बाजूने केला, तर आपली चूक कळणार नाही,
पण दोन्ही बाजूंनी केला, तर गैरसमज होणार नाही..!

गेल्या वर्षी आपल्याकडे अत्यल्प पाऊस झाल्याने शेतकरी, शेत-मजुरांसह सर्वसामान्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. पिकांचे उत्पन्नही जेमतेम झाले. त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडला. गेल्या वर्षीचा रब्बी हंगामही असाच गेला. यंदा मात्र पावसाळ्याच्या सुरुवातीपासून चांगला पाऊस पडत गेल्याने खरिपाची पिके बहरली. तीळ, मूग, उडीद या पिकांचे उत्पन्न चांगले झाले. आपल्याकडे बऱ्याच वर्षानंतर यंदा अनुकूल हवामानामुळे ही पिके जोमदार आली. परंतु काढणीच्या वेळी झालेल्या पावसाने सोयाबीनला मात्र फटका बसला. यात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले. कापसावरही पावसाचा परिणाम झाला. असे असले तरी तूर व इतर पिके चांगली आहेत. शिवाय समाधानकारक पावसामुळे शेतशिवारातील शेत जमिनीत ओलावा टिकून असून व अनुकूल हवामान असल्याने रब्बीच्या पेरण्यांचे काम शेतकऱ्यांनी सुरु केले आहे. अनेकांची रब्बीची पेरणीही झाली आहे.

यंदा जून ते सप्टेंबर या पावसाळयाच्या चार महिन्यात परळी तालुक्यात सुमारे आठशे मिलीमीटर पाऊस झाला. वार्षिक सरासरीच्या अधिक पाऊस झाल्याने तालुका यंदा पाणीदार झाला आहे. तालुक्यासह परिसरातील छोटे-मोठे तलाव, धरणे ओसंडून वहात आहेत. नदी-नाले पावसाळ्यानंतरही खळखळून वहात आहेत. विहिरी, बोरला चांगले पाणी आहे. यामुळे यंदा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. तालुक्याच्या डोंगरदऱ्यात, सखल भागात हिरवा चारा मुबलक असल्याने पशूधन मालकांची सोय झाली आहे. डोंगरपट्ट्यातील सीताफळ हा रानमेवा यंदा मोठ्या प्रमाणात पिकला आहे. त्यामुळे शेतकरी, शेतमजूरांना चांगलाच आर्थिक फायदा झाला आहे. सोयाबीनचे खळे, कापसाची पहिली वेचणी करण्याचे काम अनेक भागात सुरू आहे. गेल्या काही दिवसांपासून परळीच्या बाजारात सोयाबीनची आवकही सुरू झाली आहे. परंतु सोयाबीन व कापसाला म्हणावा तसा भाव नसल्याने शेतकऱ्यांचा हिरमोड झाला आहे. उत्पादन खर्च व बाजारातला भाव यामुळे शेतकरी मोठा नाराज झाला आहे. त्यातच सरत्या पावसाळ्यात झालेल्या पावसाने मिरची, कांदा व इतर फळपिके, पालेभाज्यांना मोठा फटका बसला आहे. परिणामी उत्पन्नात घट झाली आहे. त्यामुळे चांगला पाऊसकाळ असूनही बाजारात फळ-भाज्यांचे भाव भडकलेले आहेत. कांदा, लसून, मिरची, बटाटे चांगला भाव खात आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांची गैरसोय होते आहे. नवी पिके बाजारात आल्यावर या फळ भाज्यांचे दर उतरतील असे चित्र आहे. एकूणच यंदा पाऊसकाळ चांगला झाल्याने या नुकसानीचा गम नाही. दरम्यान, फळ-भाज्यांसह इतर जीवनावश्यक वस्तूंचे भाव वाढल्याने सर्वांचेच बजेट कोलमडले आहे. महागाईचे सावट दिवाळसणावर आहे.

या परिस्थितीत दिवाळसण आला आहे. सरकारच्या 'लाडकी बहिण' या सारख्या योजनांचे पैसे हाती पडल्याने बाजारात गर्दी वाढली असून आर्थिक उलाढालही बऱ्यापैकी सुरू झाली आहे. त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. त्यातच यंदा दिवाळीतच राज्य विधानसभेच्या निवडणुकांचा धडाका असल्याने यंदाच्या दिवाळीत डबल फटाके फुटणार आहेत. हिवाळ्याच्या तोंडावर राजकारण तापले आहे. ग्रामीण भागात सोयाबीन, कापसाचा भाव व राजकारणाच्या गप्पा रंगत आहेत. पुढाऱ्यांच्या गाड्यांची ये-जा वाढल्याने ग्रामीण भागात रस्ते धुरळयाने न्हाऊन निघत आहेत. कोण उमेदवार, कुणाची हवा यावर चर्चा रंगत आहेत. निवडणुकीत कुणाचे फटाके फुटणार हे काही दिवसानंतर दिसणार आहे. **

# अन्यथा क्रांती अटळ - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज...



तुकडोजी महाराज यांचा ''ग्रामगीता'' हा सर्वव्यापक ग्रंथ आहे. देशाच्या आर्थिक विकासाचा आलेख उंचावत ठेवायचा असेल तर ग्रामीण विकास किती महत्त्वपूर्ण आहे याचे विवेचन सत्यरूप स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न राष्ट्रसंतांनी केला असे मानण्यात मनात माझ्या संकुचित पणा येत नाही, याविषयीचे चिंतन...

'बेकारी निर्मूलन आवश्यक - देशाच्या आर्थिक विकासाचा मोठा अडसर बेकारीचा आहे विकासाचे उद्दिष्ट 'बेकारी निर्मूलन'' हे एक आहे, या विषयीचा सल्ला महाराज ग्रामगीतेतून देतात -

***गावी असावी उद्योग समिती । जी सतत करील उद्योग उन्नती।***
***गावांचे आर्थिक जीवन हाती । घेवोनी लावील रोज जी ।।४७।।***

गावांमध्ये उद्योग समिती असावी, त्यामुळे सातत्याने उद्योग उन्नती करण्यास मदत होते. त्यातून गावाचे आर्थिक जीवन हातात घेऊन रोज गावातील लोकांना रोजगार मिळवून देता येईल. अशाप्रकारे बेकारी निर्मूलन संबंधीचा विचार ग्रामगीतेतून समोर येतो. महाराज म्हणतात की,

***जयास न मिळे कामधाम । त्याने समितीस सुचवावे नाम ।***
***ग्राम सेवा अधिकारी उद्यम। देईल त्याची ।।१००।।***

***गाव पातळीवर ज्या व्यक्तीला काम मिळत नसेल तर*** समितीला नाव सुचवावे, त्यामुळे ग्राम अधिकारी काम मिळवून देण्यास मदत करील ,हे वास्तववादी चित्रण महाराज ग्रामगीतेतून व्यक्त करतात .

वंदनीय महाराज म्हणतात की,

***मजुरा मजुरी पूर्ण द्यावी । जेणे मुले बाळे सुखे जगावी ।।***
***तशीच उत्पन्न ने वाढवोनी घ्यावी । गावा माजी ।।०१।।***
***याने सर्वास मीळेल सुख । मिळेल जीवनाची भूक ।।***
***ग्रामराज्य होईल सुरेख । आर्थिक तेने समृद्ध ।।३।।***

प्रत्येक गावा गणिक मजुराला मजुरी पूर्ण द्यावी, त्यामुळे कुटुंबातील गरजा भागल्यामुळे मुले, बाळे सुखी जीवन जगतील यातून सर्वात रोख मिळून जीवनाची भूक संपवून ग्रामस्वराज्य संपन्न होण्यास मदत होईल. खरोखर गावपातळीवरील विकासाचा सुक्ष्म अभ्यास, बारकावे अर्थतज्ञाला शोभतील असेच आहे. इतके तार्किक व वास्तव चित्रण ग्रामगीतेतून आपल्यासमोर ठेवले आहे हे मान्यच करावे लागते.

देशाचा आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर समानता निर्माण करावी लागेल, त्या संपत्तीचे समान वितरण झाले पाहिजे हे अपवाद असू शकत नाही ,हे साध्य करण्यासाठी राष्ट्रसंत म्हणतात ,

***परस्परांचा विचार घ्यावा । आपला समतोल हिस्सा ठेवावा ।***
***कोणासही राग न उद्भवावा । असे करावे गावाने ।।३८।।***

वंदनीय राष्ट्रसंत म्हणतात की,

***आहे गरिबांचे रक्त । समजून वागोत श्रीमंत ।***
***श्रम ही गावाची दौलत । म्हणोनी व्हावा मान तिचा ।।५४।।***

श्रीमंतांनी व्यवहारात वागत असताना धन हे गरिबांचे रक्त समजावे, श्रमांना गावाचे दौलत मानावे म्हणून यांचा मान श्रमाला मिळावा, हा मानवतावादी विचार महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून व्यक्त केला आहे. देशात एक ना अनेक समस्या आहेत यावर वेळीच उपाय केला नाही तर क्रांती अटळ आहे ,असा सज्जड इशारा महाराज देतात. ''लोकसंख्येवर नियंत्रण - आर्थिक विकासाला अडथळा म्हणजे लोकसंख्या हा घटक आहे, यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महाराज, कुटुंब नियोजन'' हा उपाय सुचवतात -

***जरी सर्वांनी संसारी असावे । तरी संतती नियमन सांभाळावे ।***
***तीन पुत्तरावरी व्हावे । असे इच्छूं नये कोणी ।।३७।।***
***परी पुत्राचीही असावी मर्यादा । देशी न वाढावी आपदा ।***
***शरीर संरक्षणाची संपदा । गमावू नये संसारी ।।२९।।***

सर्वांनी संसार करावा पण त्यात संतती नियम कटाक्षाने पाळावे, तीन पुत्राची इच्छा ठेवू नये ,उत्तर प्राप्तीची मर्यादा असावी संसाराचा गाडा सांभाळतांना शरीर संपदा टिकवून ठेवावी ,हा सल्ला ग्रामगीतेतून समोर येतो.

''सतत उद्योग करा -

देशाचा आर्थिक विकासाचा आलेख उंचावत ठेवण्यासाठी सर्वांनी सतत उद्योगात असले पाहिजे असा सल्ला वंदनीय राष्ट्रसंत देतात -

***म्हणुनी सांगणे उद्योग शिका । पराधीन राहू नका ।***
***आपल्या हक्काचा हा पैका । गोडी चाखा तयांची ।।८५।।***
***आज निकफिदांची चलती। उद्द्या विचारू नका फजिती ।।।***
***म्हणोनी समजोनी घ्यावे उक्ती । उद्योगाची ।।८६।।***

सर्वांनी उद्योग शिकावे तो हक्क आहे याची गोडी चाखावी उद्योगाची युक्ती विचारून घ्यावे अन्यथा फजिती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

''बचत करावी - देशाचा आर्थिक विकास साध्य करावयाचा असेल तर प्रत्येकाने बचत करावी, असा सल्ला महाराज देतात -

***कमाविणे ही नव्हे श्रीमंती । बचत केली त्यांची संपत्ती ।।***
***यांचेच संपन्न होई व्यक्ती । वाढे श्रीमंती गावाची ।।०१।।***
***काटकसरीने करिता वर्तन । अपार वाचेल गावी धन ।।***
***त्याने गाव होईल नंदनवन । सर्वोतोपरी ।।४।।***

गावाची श्रीमंती वाढवण्याची असेल तर संपत्तीची बचत करावी, त्यातून गाव संपन्न होतो केवळ कमल्या मुळे माणूस श्रीमंत होत नसतो, सर्व गावांनी काटकसरीने बचत केली तर अपार धनाचा संचय केल्यामुळे गावाचे नंदनवन झाल्यावाचून राहात नाही, अशा प्रकारे महाराज ग्रामगीतेत बचत करण्याविषयीचा सल्ला देतात.

**अन्यथा क्रांती अटळ -** देशाच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहित करणाऱ्या घटकांकडे कानडोळा झाला तर महाराज म्हणतात, अन्यथा क्रांती अटळ आहे.

***अरे उठ उठा श्रीमंतानो। अधिकाऱ्यांनो। पंडितांनो ।।***
***सुशिक्षितांनो, साधू जणांनो । हाक आली क्रांतीची ।।४।।***
***हे समजण्याची जरुरी आहे । काळ त्याचीच वाट पाहे ।।***

यात सर्वांनी सजग राहावे ,क्रांतीची हाक आलेली आहे, हे सर्व समजून घ्यावे काळानुरूप बदल व्हावा अन्यथा क्रांतीची स्वारी स्वार झाल्या शिवाय राहणार नाही, असा परखड इशारा वंदनीय महाराज सर्वांना देतात. राष्ट्रसंतांनी सांगितलेली' ग्रामविकासातील सूत्र'' हे महान अर्थतज्ञाची प्रचिती दिल्यावाचून राहत नाही. काळानुरूप परिवर्तन करून विकासाचे उद्दिष्ट साध्य करावी. त्यांनी ग्रामीण विकासावर भर दिला ही जाणीव आपणास वेळीच असती तर ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या टळल्या असत्या, यावरून दूरदृष्टी असलेल्या महान अर्थतज्ज्ञाची प्रचिती येते.

खरोखरच, भूतपूर्व राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम साहेब यांचे स्वप्न प्रत्यक्षात उतरावयाचे असेल तर महाराजांच्या विचाराचा प्रचार व प्रसार वेळीच व जातीने लक्ष देऊन करावा लागणार आहे, तरच भारताची 'महासत्ताक देश'' म्हणून जगासमोर ओळख होणे शक्य आहे. हा लेख लिहिण्यामागील प्रांजळ मनोकामना येवढीच की, मजबूत अर्थव्यवस्था कशी असावी याची प्रचिती या ग्रामगीतेतून येते हे विचार प्रत्यक्षात उतरावेत, अपेक्षा. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विनम्र अभिवादन....!

**- डॉ.बळीराम पांडे, छत्रपती संभाजीनगर.**

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
* वर्ष ०८ * अंक २६ * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. २८ ऑक्टोबर २०२४ * किंमत : २ रू.

# राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत विद्यावर्धिनी विद्यालयाच्या आभा मुंडे हिने यशस्वी होऊन मिळविले सुवर्णपदक

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वैजनाथ, येथील विद्यावर्धिनी विद्यालयाची विद्यार्थीनी आभा गणेश मुंडे ही जलतरण स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यशस्वी होवून सुवर्णपदकाची मानकरी ठरली आहे. तिच्या या मोठ्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

कल्याण येथे झालेल्या राज्य पातळीवरील सब ज्युनिअर गटातून आभा मुंडे ही विद्यार्थीनी राज्यातून पहिली आली होती. या यशामुळे तिची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली होती. गोवा येथे नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत आभा मुंडे हिने ५०, १००, २०० मिटर फ्री स्टाईल या तिन्ही ही वैयक्तिक प्रकारात यश मिळविले. शिवाय १०० बाय ४ रिले सांघिक स्पर्धेतही यश मिळविले. अशा पाचही जलतरण स्पर्धेत तिने यश मिळविल्यामुळे ती सुवर्णपदकाची



मानकरी ठरून मुलींच्या सब ज्युनिअर गटात राष्ट्रीय पातळीवर यशस्वी झाली आहे. जलतरण स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश मिळवून सुवर्णपदक मिळविणारी आभा मुंडे ही परळीची पहिलीच जलतरण पटू आहे. पॅरा जलतरण फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष व गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोद सावंत यांच्या हस्ते या यशाबद्दल तिला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. या घवघवीत यशाबद्दल वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री इंगळे, शाळेच्या समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सदाशिवराव कोळगे, उपाध्यक्ष सुभाष भिंगोरे, सचिव प्रभाकर इटके, कोषाध्यक्ष प्रभाकर पैंजणे, सदस्य एम.टी. मुंडे, भालचंद्र चेवले, उन्मेष मातेकर, संजय कराड, मुख्याध्यापक राजेश्वर निला, जे.व्ही.सुमठाणे यांच्यासह क्रीडा शिक्षक विजय मुंडे, बाळासाहेब हंगरगे व इतर शिक्षक, कर्मचारी वृंदांनी शाळेची विद्यार्थीनी आभा मुंडे हिचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.



### आभा मुंडे हिचा शाळेच्या वतीने सत्कार

पॅरा जलतरण स्पर्धेत राष्ट्रीय पातळीवर यश मिळवून सुवर्णपदक मिळविणारी आभा गणेश मुंडे हिचा गुरुवारी (दि.२४) शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव प्रभाकरराव इटके, संचालक मधुकरराव मुंडे यांच्यासह उन्मेष मातेकर, संजय कराड, मुख्याध्यापक राजेश्वर निला, जे.व्ही.सुमठाणे, क्रीडा शिक्षक विजय मुंडे, बालासाहेब हंगरगे, श्री यादव यांच्यासह शाळेतील शिक्षक, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## न्यू हायस्कूल शाळेचा विद्यार्थी तन्मय तिडके याची राज्यस्तरावरील रोड रेस टाईम ट्रायल स्पर्धेसाठी निवड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय सायकलिंग स्पर्धेत परळी येथील न्यू हायस्कूल थर्मल शाळेचा विद्यार्थी तन्मय संतोष तिडके याने उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदक पटकावले आहे. या यशामुळे त्याची रोड रेस टाईम ट्रायल स्पर्धेसाठी राज्यस्तरावर निवड झाली आहे.

टाईम ट्रायल या प्रकारात तन्मय ने आपल्या कौशल्याने आणि चिकाटीने विजय मिळवला. या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रकाशदादा सोळंके, सचिव आ.सतीशभाऊ चव्हाण, शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके व इतर संचालक मंडळ यांनी तन्मयचे अभिनंदन करून त्याला पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

तन्मयच्या या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक के.एस.मोरे, पर्यवेक्षक श्री.बी.एस.राठोड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी.जी.शिंदे, क्रीडा शिक्षक एन.डी.वानखेडे व इतर शिक्षकवृंदांनी कौतुक केले आहे. **

## राजेभाऊ... तुम्ही लढा, मी तुमच्यासाठी नक्की परळीला येतो

### राजेभाऊ फड यांनी घेतली आ.अबू आझमी यांची भेट

परळी वैजनाथ,(बातमीदार):- राजेभाऊ... निकालाची काळजी करू नका. जनतेचे तुमच्यावर प्रेम आहे. तुमची मतदारसंघात सर्वत्र चांगली ओळख असून एक सुशिक्षित विकासाभिमुख नेतृत्व म्हणून जनता तुमच्याकडे आशेने पाहते. तुम्ही लढा, विजय नक्की आहे. तुमच्या संघर्षाच्या काळात मी नक्की परळीला येईन असे आश्वासन समाजवादी पक्षाचे महाराष्ट्राचे नेते अबू आझमी यांनी राजेभाऊ फड यांना दिले. मुंबई येथे गेल्या शुक्रवारी त्यांची फड यांनी सदिच्छा भेट घेतली.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी शुक्रवारी समाजवादी पार्टीचे महाराष्ट्राचे नेते अबू आझमी आ.अबू आझमी यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत त्यांची विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने अनेक विषयांवर सखोल चर्चा झाली. यावेळी संवाद साधत असताना आ.अबू आझमी यांनी राजेभाऊ फड यांना परळीला येण्याचे आश्वासन दिले. ते म्हणाले की, राज्यातील जनता परिवर्तनाच्या मानसिकतेत असून, महाविकास आघाडीला अनुकूल असे वातावरण निर्माण झालेले आहे. तुमचे परळी मतदार संघातील सामाजिक काम मी चांगलच ऐकून असून, तुम्हाला या मतदारसंघातील जनता आमदार करण्यास उत्सुक आहे. त्यामुळे तुम्ही लढा मी तुमच्यासाठी नक्कीच परळीला येईन असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. ***

## निवडणूक प्रक्रियेतील सर्वांनी जबाबदारीने कार्यवाही पार पाडावी-विभागीय आयुक्त दिलीप गावडे

बीड (जिमाका):- बीड जिल्ह्यातील सहाही मतदारसंघातील निवडणूक प्रक्रियेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अधिक सक्षम व बिनचूकपणे जबाबदारीने त्यांच्यावर सोपवलेली कामे पार पाडावीत, अशा सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी केल्या जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभानिहाय कामकाजांचा आढावा आज विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी घेतला. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अविनाश पाठक यांनी मतदारसंघनिहाय करण्यात आलेल्या सर्व कामकाजांची माहिती विभागीय आयुक्तांना दिली.

या बैठकीस छत्रपती संभाजी नगरचे उपायुक्त जगदिश मिनियार, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, प्र. अपर जिल्हाधिकारी



शिवकुमार स्वामी, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओमकार देशमुख, प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, तहसीलदार अविनाश शिंगटे, तसेच सर्व विभागाचे नोडल अधिकारी यांची उपस्थिती होती. तर बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा क्षेत्रातील निवडणूक निर्णय अधिकारी ऑनलाईन माध्यमातून उपस्थित होते. सहाही मतदारसंघातील निवडणूक प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने प्रशाससनाने केलेली तयारी, टपाली मतपत्रिका, स्वीप कार्यक्रम याबाबत सविस्तर माहिती जिल्हाधिकारी यांनी विभागीय आयुक्त यांना दिली. विभागीय आयुक्तांनीही निवडणूक यंत्रणेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कामाचे कौतुक करत निवडणूक प्रक्रिया अचूकपणे राबविण्याच्या सूचना यावेळी केल्या.**

## टपाली मतपत्रिकांची कार्यवाही अचूकपणे पार पाडा- शैलेश सूर्यवंशी

बीड (जिमाका):- बीड जिल्ह्यातील सहाही विधानसभा मतदारसंघातील अधिसूचित मतदार, ८५ वर्षांहून अधिक वय असलेले मतदार, मतदार यादीनुसार असलेले दिव्यांग मतदार, निवडणूक कर्तव्यार्थ नेमणुकीसाठी असलेल्या मतदारांसाठीच्या टपाली मतपत्रकांसाठी करावयाची कार्यवाही अचूकपणे पार पाडावी, अशा सूचना टपाली मतपत्रिका विभागाचे नोडल अधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हास्तरीय टपाली मतपत्रिका कक्षाच्यावतीने जिल्ह्यातील सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, टपाली मतपत्रिकांचे नोडल अधिकारी यांचे ऑनलाईन माध्यमातून प्रशिक्षण आज पार पडले. प्रशिक्षण श्री. सूर्यवंशी आणि निवडणूक उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांनी दिले. यावेळी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कृष्णा शिंदे, जिल्हा सहायक निबंधक ए.बी. अट्ठळे, जिल्हा सूचना अधिकारी भाऊसाहेब बांगर, तहसीलदार अविनाश शिंगटे, तंत्रज्ञ महादेव भाकरे यांची उपस्थिती होती.

प्रशिक्षणात इटीपीबीएमएस या इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे सेवा मतदार (संरक्षण दलातील मतदार) यांच्या मतपत्रिका, अधिसूचित मतदार, ८५ वर्षांवरील मतदार, दिव्यांग मतदार, मतदार यादीनुसार दिव्यांग मतदार आणि मतदानादिवशी मतदान केंद्रांवर जाऊन मतदान न करू शकणाऱ्या निवडणूक कर्तव्यार्थ नेमणूक केलेल्या मतदारांच्या मतपत्रिकांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शन श्री. सूर्यवंशी, श्री. कांबळे, श्री. बांगर यांनी केले. प्रशिक्षणास उपस्थित अधिकारी, कर्मचारी यांच्या शंकांचे निरसनही मार्गदर्शकांनी यावेळी केले. **